IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

# महाड तालुक्यातील अपरिचीत कोल लेणी

**सौ. योजना यो. हळदे**

एम. एम. जगताप कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय महाड. रायगड

**सारांश :**

महाड तालुक्यातील कोल्हे गाव आहे या गावात प्राचीन बौद्ध लेणी आहेत. इथे एकूण सात लेणी आहेत. या गावात बधवाडीच्या वरच्या डोंगरात ऐतिहासिक बौद्ध लेण्या आहेत.या लेण्यांचा इतिहास पाहता सातवाहन काळातील ब्राहमी लिपी मधील शिलालेख आहे. तसेच या लेण्या बांधण्या मागचे कारण बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी जे भिकू प्रवास करीत असतात त्यांच्या राहण्याची व्यवस्था म्हणून ही लेणी कोरलेली आहे.

**प्रस्तावना :**

या गावात प्राचीन बौद्ध लेणी आहेत. इथे एकूण सात लेणी आहेत. या लेण्यांचा इतिहास पाहता सातवाहन काळातील ब्राहमणी लिपी मधील शिलालेख असून लेखांमध्ये कोणत्याही ज्ञात व राजवंश उल्लेख केलेला नाही. तरी साधारण लिपी व लेण्यांचे बांधकाम शैलीवरून ही लेणी सातवाहन काळात कोरलेली आहेत. गौतमीपुत्र सातकर्णी यांच्या अधिपत्याखाली अपरांत संघराज्य होते.नहपान राजाकडून अपरांत गौतमीपुत्र सातकर्णीने आपल्या अधिपत्याखाली घेतले होते.

**इतिहास :**

महाड तालुक्यातील कोल्हे गाव आहे. या गावात प्राचीन बौद्ध लेणी सापडले आहे. या लेण्याचा इतिहास पाहता सातवाहन काळातील ब्राहमणी लिपी मधील शिलालेख असून लेखांमध्ये कोणत्याही ज्ञात राजवंश उल्लेख केलेला नाही. तरी साधारण भाषा लिपी व लेण्यांचे बांधकाम शैलीवरून ही लेणी सातवाहन काळात कोरलेली आहेत. या लेण्यांचा इतिहास पाहता ही सातवाहनकालीन लेणे आहेत.गौतमीपुत्र सातकरणे यांच्या अधिपत्याखाली अपरांत संघराज्य होते. नपान राजाकडून अपरांत गौतमीपुत्र सातकर्णीने आपल्या अधिपत्याखाली घेतले होते. याचवेळी भारतात बौद्ध धम्म हे जोमाने वाटचाल करीत होता. सम्राट अशोकाचे मांडलिक राजे म्हणून

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

सातवाहन राजाचा उल्लेख सापडतो. आणि अशोकाच्या काळात महाराष्ट्रात बौद्ध धम्म प्रगतीच्या उंच शिखरावर होता अगदी इ.स. १० व्या शतकानंतर ही.

कोल्हे यांची बांधणी सातवाहन काळात असून ती भीषण निवास करण्यासाठी बांधलेली लेणी आहे. शिवाय हा एक व्यापारी मार्ग देखील असल्याने या ठिकाणी व्यापाऱ्यांना विसावा घेण्यासाठी देखील या लेण्यांचा वापर केला जात असावा. कारण यासाठीजवळपास सहा भिक्खू निवास आहेत.

**लेणी क्र.१ :**

ही एक छोटे भिक्षु निवास आहे.सध्या ते मातीने पूर्ण भरलेले असून त्यावरील शिलालेख ही अस्पष्ट झालेला आहे. या लेण्या भिक्षून ना राहण्यासाठी बांधले असून या लेण्या मुख्या लेण्यांच्या अगदी उजव्या हाताला असणारी छोटी लेणी आहेत.याचा वापर राहण्यासाठी किंवा अध्ययनासाठी केला जात असावा .

**लेणी क्र.२ :**

हे मुख्य विहार लेणी आहे.या ठिकाणी प्रार्थना स्थान असण्याची शक्यता आहे.गावकऱ्यांच्या म्हणन्यातूनयेथे नाणी सापडले आहेत.या लेण्यांची कमान व आतील एक छोटी संघरम पाहायला मिळते.तसेच हे विहार मोठे व उंची कमीत कमी वीस फूट असू शकते. लेण्यांच्या डाव्या बाजूला आत मध्ये एक खोली आहे.या लेण्यांच्या डाव्या बाजूला भिंतीवर एक शिलालेख कोरलेला आहे. यात "ठरत गहपती पुतस सेठीस संघरखित सदय धम लेन"असा उल्लेख आहे. या उल्लेखानुसार हे मुख्य लेन असून बौद्ध धम्माशी संबंधित आहे. या लेण्यांचे बांधकाम इ.स. पूर्व पहिल्या शतकात केलेले आहे. मातीने भरल्यामुळे दर्शनी भाग छोटा वाटतो. तसेच लेण्यांवर कोणतीही कलाकुसर नाही पण कोरीव शिलालेख मात्र आहेत.

**लेणी क्र.३ :**

हे एक छोटेसे संग्राम आहे. अगदी प्रमुख लेण्यांच्या बाजूलाच हे कोरलेले आहे.व याच्याच बाजूला प्रमुख लेण्याविषयीचा शिलालेख आहे. या लेण्यांची पडझड झालेली असून आत मध्ये कोरे व आसन आहे. जे भिक्षूंना ध्यान साधना करण्यासाठी कोरलेले असावे. छोटासा दरवाजा व आत मध्ये आसन आहे. सध्या लेणे हे बघणं अवस्थेत आहेत समोर मातीने पूर्ण भरलेले आहे.

**लेणी क्र. ४ :**

हे भिकू निवास आहे हे भिकू गृह आहे. अगदी कोरीव असे लेणे आहे. एकाच दगडातही सारी लेणी कोरलेली आहे या लेण्यांच्या वरती एक शिलालेख कोरलेला आहे यामध्ये " अधासकस गमिकियरजा सिवदतस लेणे "

**लेणे क्र. ५ :**

हे देखील भिकू निवास आहेत. या लेण्यात एक आसन व्यवस्था शिवाय लेण्याच्या चौकटीवर एक शिलालेख आहे. या लेण्यांचा दरवाजा व खिडकी आहे., व प्रवेशद्वार आहे. आतमध्ये कोरीव खोदकाम केले असून दगडात लेणी कोरले होती या लेण्यांचा प्रवेशद्वारावर शिलालेख आहे " भद्र उपासकस दूहुतूय"

**लेणी क्र.६ :**

हा एक संघाराम आहे. परंतु पूर्णतः मातीखाली गाडला गेलाय त्याच्या आजूबाजूच्या खुणा दिसत आहेत. याचे उत्खनन केल्यास ते एक मोठे संघाराम सापडेल इथे सुद्धा आसन व्यवस्था असेल.

**लेणी क्र.७ :**

या लेणी मध्ये कोरीव काम नाही यामध्ये फक्त संघाराम आहे. भिक्षू ना निवास करण्यासाठी बांधलेली ही लेणी आहे. आकाराने थोडी मोठीयामध्ये चौकोनी कडा आहे. कोरीवपणे कोरलेली आहेत. आतमध्ये सध्या पद्धतीची बांधणी आहे पण ही लेणी आता भग्न अवस्थेत आहेत.

**निष्कर्ष :**

सदर सर्व देण्या पाहिल्यानंतर ही बौद्ध धम्माच्या भिकूंसाठी मानण्यात आलेली बौद्ध लेणी आहेत. या लेण्याची बांधणी एकाच दगडात कोरलेली आहेत कातळात ही लेणी कोरलेली आहेत. त्यांच्या बाजूच्याडोंगरात अजून काही लेणी आहेत शिवाय कॉल लेणी प्राचीन असून सातवाहन कालीन इतिहास आहे. त्यांचा पुरातन वारसा मौल्यवान आहे बौद्ध लेण्यांची अशी अवस्था कायम होत राहिलेली आहे. कारण लोकांच्या मनात असणारे अज्ञान आणि यामुळेच ही लेणी अशीच पडलेली आहे. ही लेणी उपेक्षित राहू नये म्हणून याकडे लक्ष देणे आवश्यक आहे .

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

संदर्भ :

१) प्रत्यक्ष भेट

२) hostedopen.com

3) https://hostedopen.com